वर्ष १० वे  विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# परळीत गुंडगिरी वाढली

## काही लोकांच्या डोक्यात लवकर सत्ता गेली, त्यांना पराभूत करा ;धनंजय मुंडेंवर अप्रत्यक्ष हल्ला



परळी,(दिव्य न्युज):- बऱ्याच दिवसांनी परळीला येणे झाले आहे. अलीकडच्या काळात परळीमध्ये गुंडगिरी वाढलीये. बीड जिल्ह्याने सर्व आमदार निवडून देण्याचं काम केले होते. दुर्दैवाने आता परिस्थिती बदलली सत्ता आल्यानंतर सत्ता डोक्यात जाऊ द्यायची नाही. काहींच्या डोक्यात सत्ता फार लवकर गेली. लोकांना त्रास देणं हे कुठेतरी थांबलं पाहिजे, असं म्हणत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी अप्रत्यक्षरित्या धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली. परळी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळीत सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले, एक दिवशी माझ्या मुंबईतील घरी एकदा पंडित अण्णा आणि धनंजय मुंडे आले होते. त्यांनी सांगितले की, आमच्यावर काही अडचणी आहेत. त्यातून बाहेर काढण्यासाठी आम्हाला तुमची मदत पाहिजे. मी म्हणालो कसली मदत? ते म्हणाले, हा माझा मुलगा आहे. याच्याकडे लक्ष ठेवा. . म्हणून पंडित अण्णा यांच्या सांगण्यावरुन आम्ही लोकांसाठी नेतृत्व दिले. मी त्यांना संधी दिली, पक्षात घेतलं. विरोधी पक्षनेता केलं. त्यांना आमदार केले, मंत्री केले. ऐकेकाळी बीड जिल्ह्याने माझे सर्व आमदार निवडून दिले

▶▶ पान २ वर

# बनसारोळ्याच्या गायरान जमिनीत गांजाची लागवड

## ५८ लाख रुपयांचा ५५० किलो गांजा जप्त



केज,(दिव्य न्युज):- बनसारोळा (ता. केज) येथील सरकारी गायरान जमिनीत गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्यासह युसुफवडगाव पोलिसांनी शुक्रवारी (दि. ८) दुपारी ४ वाजेच्या सुमारास छापा मारला. यावेळी पोलिसांनी गांजाची झाडे उपटून ५७ लाख ९० हजार रुपयांचा ५५० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील बनसारोळा येथील सरकारी गायरान जमीन असून या जमिनीत पारधी समाजाचे लोक वस्ती करून राहतात. वस्तीलगत गांजाची लागवड करण्यात आल्याची गुप्त माहिती मिळताच सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना व युसुफवडगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी सहकाऱ्यांसह शुक्रवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास छापा मारला. यावेळी गायरान जमिनीतील गांजी झाडे लागवड केल्याचे निदर्शनास आले. पोलीस कर्मचाऱ्यांनी तब्बल दोन तासाहून अधिक वेळ मेहनत घेत गांजाची झाडे उपटून काढली. नायब तहसीलदार आशा वाघ व तलाठी श्रीमती वाघमारे यांच्या उपस्थितीत सदरील गांजाच्या झाडांचे जाग्यावर वजन करण्यात आले. पोलिसांनी अंदाजे ५७ लाख ९० हजार रुपयांचा ५५० किलो गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी युसुफवडगाव पोलिसात अज्ञात व्यक्तिविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. ही गांजाची झाडे कोणी लागवड केली ? याचा पोलीस तपास करीत आहेत.

ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, युसुफवडगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, फौजदार राहुल पतंगे, सहाय्यक फौजदार अशोक थोरात, दिनकर तोंडे, योगेश समुद्रे, गणेश राऊत, महादेव केदार, जीवन जाधव, सुधीर बामदळे, भगवान खेडकर, प्रेमीला गाडेकर यांच्या पथकाने कारवाई केली.

दिव्य वार्ता

३५ वर्षे शहराची सत्ता ज्यांच्या हाती होती त्यांनी शहराचा सत्यानाश केला

# आता त्यांच्या 'युवराज' ला आपण आमदार करणार का?

## विकासाच्या नावाने आलेला निधी हडप केला, संपूर्ण शहराला बकाल करून ठेवले



बीड, (दिव्य न्युज):- ३५ वर्षे ज्यांच्या हाती बीडकरांनी एक हाती सत्ता दिली ते विकासाच्या नावाने या सत्ताधाऱ्यांनी शासनाकडून शहराच्या विकासासाठी हजारो-करोडो रूपयांचा निधी आणून हडप केला आणि संपूर्ण शहराचा सत्त्यानाश केला. विकासाच्या नावाने आलेला निधी हडप करणाऱ्या आणि शहराचाला बकाल करून ठेवणाऱ्यांच्या युवराज ला आपण बीडचे आमदार करणार का? अशी काहींशी चर्चा बीड शहरात जोर धरू लागली असून प्रथम ३५ वर्षाच्या विकासाच्या नावानी आलेल्या निधीचा हिशोब द्या मगच आमदारकीसाठी मतदान मागा अशीही चर्चा मतदारांमध्ये होत आहे. ▶▶ पान २ वर

वक्फ विधेयकाला विरोध, आरएसएसवर बंदी, मुस्लिमांना आरक्षण...

# मविआला पाठिंबा देण्यासाठी उलेमा बोर्डाच्या १७ अटी




मुंबई ,(दिव्य न्युज):- महाराष्ट्रात निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय खलबतेही वाढत आहेत. दरम्यान, ऑल इंडिया उलेमा बोर्डाने महाविकास आघाडीला पत्र लिहून सरकार स्थापनेला पाठिंबा दिला आहे. ऑल इंडिया उलेमा बोर्ड एमव्हीए उमेदवारांनाही प्रोत्साहन देईल, परंतु त्यासाठी काही अटी ठेवल्या आहेत.

ऑल इंडिया उलेमा बोर्डाने आपल्या १७ मागण्यांसह उद्धव ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांना एक पत्र पाठवले आहे, ज्यामध्ये एमव्हीएने त्यांच्या अटी मान्य केल्यासच ते महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत त्यांना पाठिंबा देतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

१. वक्फ विधेयकाला विरोध. २. नोकऱ्या आणि शिक्षणात १०% मुस्लिम आरक्षण. ३. महाराष्ट्रातील ४८ जिल्ह्यांतील मशिदी, कब्रस्तान, दर्ग्यांच्या जप्त केलेल्या जमिनींचे आयुक्तांमार्फत सर्वेक्षण करण्याचे आदेश द्यावेत. ४. महाराष्ट्राच्या वक्फ बोर्डाच्या विकासासाठी १००० कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा. ५. २०१२ ते २०२४ पर्यंत दंगल पसरवल्याच्या आरोपाखाली तुरुंगात डांबलेल्या निरपराध मुस्लिमांची सुटका करण्याची मागणी. ६. मौलाना सलमान अझहरीला तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी चत- खासदारांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले. ७. महाराष्ट्रातील मशिदींच्या इमाम आणि मौलाना यांना दरमहा १५,००० रुपये देण्याचे सरकारचे आश्वासन. ८. पोलीस भरतीतही मुस्लिम तरुणांना प्राधान्य द्यावे. ९. महाराष्ट्रातील सुशिक्षित मुस्लिम समाजाला पोलीस भरतीमध्ये प्राधान्य द्यावे. १०. रामगिरी महाराज आणि नितेश राणे यांना तुरुंगात टाकल्याचा महाविकास आघाडीने निषेध करावा. ११. महाराष्ट्रामध्ये भारत आघाडीच्या मित्रपक्षांची सत्ता आल्यानंतर ऑल इंडिया उलामा बोर्डाचे मुफ्ती मौलाना, अलीम हाफिज मशिदीचे इमाम यांचा सरकारी समितीमध्ये समावेश करावा. १२. महाराष्ट्र विधानसभेच्या २०२४ च्या निवडणुकीत मुस्लिम समाजातील ५० ▶▶ पान २ वर

# 'बटेंगे तो कटेंगे'ला 'जुडेंगे तो जितेंगे'

## काँग्रेसकडून भाजपला प्रचारात प्रत्युत्तर

मुंबई, नागपूर, (दिव्य न्युज):- 'बटेंगे तो कटेंगे' या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या घोषणेवर राज्याच्या निवडणूक प्रचारात जोर देऊन भाजपने मतांच्या ध्रुवीकरणावर भर दिला असतानाच काँग्रेसने 'जुडेंगे तो जितेंगे'या उत्तर प्रदेशमध्ये लोकप्रिय ठरलेल्या घोषणेने प्रत्युत्तर दिले आहे. 'बटेंगे विरुद्ध जुडेंगे' ही हिंदी पट्ट्यातील घोषणा राज्याच्या निवडणूक प्रचाराच्या केंद्रस्थानी आली आहे.

उत्तर प्रदेशामधील विधानसभेच्या नऊ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीत मतांच्या ध्रुवीकरणाकरिता मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा दिला आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला उत्तर प्रदेशात मोठा फटका बसला. विधानसभेच्या पोटनिवडणुकीतही त्याचीच पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आदित्यनाथ यांनी मतांच्या ध्रुवीकरणावर भर दिला आहे. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेला समाजवादी पार्टीने 'जुडेंगे तो जितेंगे' प्रत्युत्तर दिले आहे. तर 'जुडेंगे तो आगे बढेंगे' असे प्रत्युत्तर बसपाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी दिले आहे.

राज्यातील निवडणूक प्रचारात योगी आदित्यनाथ यांनी या 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा दिला आहे. योगींच्या दौऱ्यानिमित्त मुंबईसह राज्यातील विविध शहरांमध्ये या घोषणेचे फलक मोठ्या प्रमाणावर लावण्यात आले आहेत. भाजपकडून वातावरणनिर्मितीसाठी या घोषणेचा वापर केला जात असतानाच काँग्रेसच्या वतीने 'जुडेंगे तो जितेंगे'ने प्रत्युत्तर दिले जाईल, असे छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले. 'बटेंगे तो कटेंगे' याचा अर्थ मतांचे विभाजन झाल्यास पराभव अटळ, असा युक्तिवाद भाजपकडून करण्यात येत आहे. अल्पसंख्याकांचे एकगठ्ठा मतदान होते. त्यावर बुहसंख्यांच्या मतांचे विभाजन होऊ नये, अशी योगी आदित्यनाथ यांची

▶▶ पान २ वर

# कुटुंबावर व समाजावर झालेल्या खोट्या गुन्ह्यामुळे जगताप यांना पाठिंबा



## सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक-मोहन जगताप

माजलगाव ,(दिव्य न्युज):- आ.प्रकाश सोळंके यांनी या पाच वर्षात सुडाचं राजकारण केलं आहे. पूर्वी पंचवीस वर्षात कधी केलं नाही ते त्यांनी या पाच वर्षात केलं आहे.माझ्या कुटुंबीयातील सदस्यावर हे गुन्हे दाखल केले आहेत.मराठा संदर्भात आरक्षण प्रश्नावरही त्यांनी वादग्रस्त विधान करून समाजाचा रोष घेतला आहे.

त्यामुळे मी मोहन जगताप यांना पाठिंबा देत आहे.असे पत्रकार परिषदेत सांगत मा.सभापती नितीन नाईकनवरे यांनी जगताप यांना पाठिंबा दिला.यामुळे जगतापांचे बळ वाढले

▶▶ पान २ वर

# ऊसतोड मुकादमाच्या जीपची काच फोडून अडीच लाख लांबविले

## वडवणी येथील घटना ; पोलीसात गुन्हा दाखल

वडवणी,(दिव्य न्युज):- ऊसतोड मुकादमाने जीपमध्ये ठेवलेले अडीच लाख रुपये काच फोडून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची धक्कादयाक घटना काल वडवणी शहरात दुपारी चार वाजेण्याच्या सुमारास घडली आहे. ऊसतोड मुकादम रामकिसन शंकर चोले यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

खडकी येथील रामकिसन चोले वय ५० वर्ष, रा. खडकी हे गेल्या काही वर्षांपासून मुकादम म्हणून काम करतात त्यांचा करार कर्नाटक येथील बसवेश्वर कारखान्याकडे आहे. ऊसतोड मजुरांसाठी कारखान्याकडून आलेले चार लाख

पान २ वर

# हिवाळी अधिवेशनात वक्फ विधेयक मंजुर करण्याचा प्रयत्न

## विरोधक अनिच्छुक ;जदयू,टीडीपी, इतरांनी मौन पाळले

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपचे प्रमुख नेते संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात वादग्रस्त वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ मंजूर करून घेण्यास उत्सुक आहेत.

संयुक्त संसदीय समितीही (जेपीसी) वक्फ बोर्डाच्या कामकाजाबाबत परिस्थिती पाहण्यासाठी पाच राज्यांमधील जागेचा अभ्यास करत आहे, तसेच अहवाल सादर करण्यासाठी तत्परतेने काम करत आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हा अहवाल सादर करणार असल्याचे जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी सांगितले. या वर्षीच्या अधिवेशनातच सरकार हे विधेयक मंजूर करेल, असे संकेतही अमित शाह यांनी

▶▶ पान २ वर

# ‘अलिगड’चा अल्पसंख्याक दर्जा कायम

## सर्वोच्च न्यायालयाचा चार विरूध्द तीन असा बहुमताने निकाल

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ४-३ च्या बहुमताने अलिगढ मुस्लिम विद्यापीठाला (-चण) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३० नुसार अल्पसंख्याक दर्जा मिळण्याचा अधिकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने ४-३ अशा बहुमताने हा निर्णय दिला आहे. स्वत: सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने ज्यामध्ये सीजेआय डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती जेडी पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचा समावेश होता, त्यांनी अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा दर्जा घटनेच्या कलम ३० नुसार अल्पसंख्याक संस्था म्हणून कायम ठेवण्याच्या बाजूने निर्णय दिला.

न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने उलट निर्णय दिला. २००६ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात अलीगढ मुस्लिम विद्यापीठाला अल्पसंख्याक संस्था मानली नाही. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, त्यावर सुनावणी पूर्ण करून सर्वोच्च न्यायालयाने १ फेब्रुवारी रोजी निर्णय राखून ठेवला होता.

सात न्यायाधीशांच्या घटनापीठाचा बहुमतातील (४:३) निर्णय आहे की एखादी शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक ठरण्यासाठी पुढील निकष विचारात घेतले जावेत.

१. संस्थेची स्थापना अल्पसंख्याकांद्वारे करण्यात आली होती का?

२. ऋसंविधानाची अंमलबजावणी झाली त्यावेळी, संबंधित संस्था अल्पसंख्याक दर्जाची होती का?

३. ऋकार्यालयीन कागदपत्रे, पत्रव्यवहार इत्यादी पुरावे विचारात घेऊन संस्था अल्पसंख्याकांसाठी होती का, याचा विचार केला गेला पाहिजे.

४. अल्पसंख्याक दर्जा असलेल्या संस्थेचे व्यवस्थापन अल्पसंख्याकांकडे असणे गरजेचे नाही.

काय आहे संपूर्ण प्रकरण

१९६८ च्या एस. अझीझ बाशा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एएमयूला केंद्रीय विद्यापीठ मानले होते. परंतु १९८१ मध्ये, एएमयू कायदा १९२० मध्ये सुधारणा करून संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा





पुनर्संचयित करण्यात आला. नंतर याला अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.

२०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवले होते. सुनावणीदरम्यान, सरकारच्या अखत्यारीत असलेले विद्यापीठ अल्पसंख्याक संस्था असल्याचा दावा करू शकते का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. १९६७ मध्ये अझीझ बाशा विरुद्ध भारतीय प्रजासत्ताक या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा अल्पसंख्याक दर्जाही नाकारला होता. तथापि, १९८१ मध्ये, सरकारने एएमयू कायद्यात सुधारणा करून विद्यापीठाचा अल्पसंख्याक संस्थेचा दर्जा पुन्हा बहाल केला.

# लोकसभेला अफवांमुळे महाराष्ट्र कमी पडला: सेनगावच्या सभेत पंकजा मुंडे यांची टीका

हिंगोली, (दिव्य न्युज):- लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या विरोधात अफवा पसरवण्यात आल्या होत्या. विरोधकांनी फेक नॅरेटिव्ह पसरवले होते. विरोधकांच्या अपप्रचाराला जनता बळी पडली, त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र कमी पडला, असे प्रतिपादन भाजपच्या आमदार पंकजा मुंडे यांनी केले.



सेनगाव येथे महायुतीचे उमेदवार तान्हाजी मुटकुळे यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी आयोजित सभेत त्या बोलत होत्या. या वेळी आमदार महंत बाबूसिंग महाराज, माजी आमदार गजानन घुगे, रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, कैलास काबरा यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पंकजा मुंडे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली देशाचा, राज्याचा विकास झाला. देशापासून सुरू झालेला विकास मतदारसंघापर्यंत आला आहे. आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो. राज्यात विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला असून मोठ्या संख्येने विकासकामेही झाली आहेत. आम्ही केवळ बोलून दाखवत नाही तर ते करून दाखवतो, असेही त्यांनी सांगितले.विधानसभा निवडणुकीत विरोधकांच्या अपप्रचाराला बळी पडू नये, असे आवाहन त्यांनी केले. महायुतीच्या सभेला होणारी गर्दी हेच विजयाचे प्रतीक असल्याचा दावा मुंडे त्यांनी केला.

# रिपाइं पूर्ण ताकदीने डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पाठीशी

## रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांची ग्वाही; क्षीरसागरांची रिपाइं कार्यालयास भेट

बीड ,(दिव्य न्युज):-बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, रिपाइं महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) कार्यालयास शनिवारी (दि.१५) भेट देवून युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्याशी चर्चा केली. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी ताकद उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महायुतीचा प्रमुख घटक पक्ष म्हणून रिपाइं पूर्ण ताकदीनिशी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी राहिल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाले आहे. या बैठकीस महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जैतुल्ला खान, नसीर अन्सारी, नगरसेवक प्रेम चांदणे, अशोक वाघमारे, आर.पी.आय.चे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, तालुकाध्यक्ष किसन तांगडे, युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, युवक तालुकाध्यक्ष सुभाष तांगडे, शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, युवक शहराध्यक्ष भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, धम्मा पारवे, बापू पवार आदी उपस्थित होते. प्रभाकर चांदणे, मायाताई मिसळे, नवनाथ डोळस, राजाभाऊ वक्ते, भास्कर जावळे, मच्छिंद्र निकाळजे, रामेश्वर खळगे,




दयानंद उबाळे, नामदेव वाघमारे, भिमराव घोडराव, अविनाश जोगदंड, विजय ओव्हाळ, श्रीमंत जाधव, कैलास जोगदंड, प्रा.आनंद मोरे, भैय्यासाहेब मस्के यांच्यासह रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भाजप, शिवसेना, रिपाइं., एस.आर.पी. व मित्रपक्षांच्या महायुतीचा बीड विधानसभेचा अधिकृत उमेदवार म्हणून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मला जाहीर पाठींबा दिला. याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांसह आर.पी.आय.पक्षाचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

# संदीपभैय्यांच्या विजय निश्चितीसाठी पवार साहेब बीडमध्ये मुक्कामी

## सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा-आ.संदीप क्षीरसागर

बीड,(दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदार यांनीरसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांच्या विजय निश्चिततेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे अध्यक्ष, महाविकास व इंडिया आघाडीचे प्रमुख नेते खा.शरदचंद्र पवार साहेबांची बीड शहरात शनिवारी (दि.९) रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाहीर प्रचार सभा होणार आहे. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर बीड जिल्ह्यात सगळे आमदार आणि पुढारी सत्तेत सहभागी झाले. परंतु जिल्ह्यात एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागरांनी पवार साहेब व आपल्या पक्षाची साथ सोडली नाही. याच एकनिष्ठतेचे आणि आपली भूमिका व विचार न सोडण्याचे फळ म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांना दुसर्यांदा संधी मिळाली आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्रपक्षांची महाविकास आघाडी यांचे अधिकृत उमेदवार असलेले संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी खा.शरदचंद्र पवार



साहेबांची बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६:०० वाजता भव्य जाहीर सभा होणार आहे. या सभेला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# अंबिका चौकात पोलिस कर्मचाऱ्यास टॅम्पोने चिरडले

## आज सकाळी घडली दुर्देवी घटना

बीड,(दिव्य न्युज):- सिमेंट घेवून निघालेल्या टॅम्पोखाली पोलिस कर्मचारी आल्याने सदरील कर्मचारी जागीच ठार झाल्याची दुर्देवी घटना आज सकाळी शहरातील पांगरी रोडवर असलेल्या अंबिका चौक भागात घडली. टॅम्पो चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले.

शिवाजी नगर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले सुनिल घोळवे (वय ५४ वर्षे) हे आज सकाळी स्कुटी क्रं. एम.एच४४.ए.ए.९०७६ यावर पांगरी रोडवरून अंबिका चौक या कडे येत होते. अंबिका चौकातून पांगरी रोडकडे सिमेंट घेवून निघालेल्या टॅम्पोच्या खाली सुनिल घोळवे यांची स्कुटी आल्याने यामध्ये घोळवे हे टायरखाली आल्याने यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले.

पान १ वरून

### परळीत गुंडगिरी

होते. त्यामुळे तरुण पिढीचं नेतृत्व म्हणून मी त्यांना प्रोत्साहन देण्याचं काम केलं. दुर्दैवाने परिस्थिती बदलली. सत्ता आल्यानंतर पाय जमिनीवर ठेवावे लागतात. त्यांच्या डोक्यात लवकर सत्ता गेली. आज तुमच्या भागात अनेक प्रश्न आहेत. त्याच्या मागे कोण आहे ते लोक सांगतील, असंही शरद पवारांनी नमूद केलं.

बीड जिल्ह्याने सर्व आमदार निवडून देण्याचं काम केले होते. दुर्दैवाने आता परिस्थिती बदलली सत्ता आल्यानंतर सत्ता डोक्यात जाऊ द्यायची नाही. काहींच्या डोक्यात सत्ता फार लवकर गेली. लोकांना त्रास देणं हे कुठेतरी थांबलं पाहिजे.बजरंग सोनवणे म्हणाले, पवार साहेबांनी या मतदारसंघाला आमदार मंत्री पद दिले. सर्व काही दिले तरी साहेबांना धोका देण्याचे पाप केले. सरकार येत असतात आणि जात असतात. तुम्ही भयभीत होऊन काम करू नका. पालकमंत्री म्हणाले होते की, या परळी मतदार संघ भाजप मुक्त करू. बीड जिल्ह्यात सर्वाधिक राष्ट्रवादीची ताकद आहे.

### आता त्यांच्या

शहरवासियांनी यांच्यावर विश्वास केला, एक हाती सत्ता दिली कधी नव्हे त्या नगर पालिकेच्या इतिहासात ४६ पैकी ४५ नगरसेवक निवडून दिले ते फक्त विकासासाठी... शहरवासियांनी यांच्यावर ३५ वर्षे विश्वास केला, पण यांनी शहरवासियांना मोठा धोका दिला. आज शहराची अवस्था अत्यंत बकाल असून आज ही शहरवासियांना २०-२० दिवस प्यायला पाणी मिळत नाही, स्वच्छतेचे तिन तेरा झाले, रस्त्यांची अवस्था दयनीय झाली या दोन वर्षात शहरातील अनेक रस्ते झाले, या रस्त्याच्या कामांसाठी आलेला निधी पहिलेच उचलून खाल्ला आणि नंतर या रस्त्याच्या कामाचे काम केले ते फक्त शहरवासियांच्या विरोधामुळे.... आज शहरवासियांच्या मनात यांच्या विषयी प्रचंड चिड असून असल्या घाणेरड्या राजकारण करणाऱ्या आणि बोगसगिरी करून आलेला विकास निधी हडप करणाऱ्यांच्या युवराज ला बीडची मतदार कदापीही मतदान करणार नाही अशीही चर्चा बीड शहरात अनेक ठिकाणी होत आहे. ३५ वर्षात आमच्याकडून अनेक दर्जेदार विकास कामे झाले आणि पुढेही असेच विकास कामे करण्यासाठी आम्हाला मतदान करा असे खोटे आश्वासने देवून हे युवराज गल्लो गल्ली मतांची भिक मागतांना फिरतांना दिसून येत आहेत. १२ वाजल्याचे चिन्ह असलेल्या चिन्हासमोरील बटन दाबून मला मतदार संघाच्या विकासासाठी मतदान करा असे म्हणणाऱ्या या युवराजांनी प्रथम ३५ वर्षाचा हिशोब द्यावा आणि नंतर मतदान मागावे अशी चर्चा मतदारात होत असून आता असल्या खोटे आश्वासने देणाऱ्यावर आम्ही विश्वास करणार नाही शहराचा आणि मतदार संघाचा विकासाची मजबुत आश्वासने देणाऱ्यांनाच आता बीडकर मतदान करणार असल्याचीही चर्चा होत आहे.

### वक्फ विधेयकाला विरोध,

उमेदवारांना तिकीट द्यावे. १३. महाराष्ट्र सरकारने राज्य वक्फ बोर्डात ५००

कर्मचाऱ्यांची भरती करावी.१४. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवरील अतिक्रमण काढण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेत कायदा करावा. १५. आमचे प्रेषित मुहम्मद यांच्या विरोधात बोलणाऱ्या लोकांवर कायदेशीर बंधने घालण्यासाठी कायदा करावा. १६. जेव्हा भारत आघाडीच्या भागीदारांनी महाराष्ट्रात सरकार स्थापन केले तेव्हा ठडड वर बंदी घातली पाहिजे. १७. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ भारत आघाडीच्या प्रचारासाठी ४८ जिल्ह्यांतील अखिल भारतीय उलेमा बोर्डाला आवश्यक यंत्रणा पुरविण्यात यावी.महाराष्ट्रातील ४८ जिल्ह्यांमध्ये अखिल भारतीय उलेमा बोर्ड कार्यरत आहे. मागणी मान्य करण्यासाठी भारत आघाडीचे नाना पटोले, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी आश्वासन पत्र द्यावे, असे ऑल इंडिया उलेमा बोर्डाने निवेदनात म्हटले आहे.

### ‘बटेंगे तो कटेंगे’

भूमिका असल्याचे सांगितले जाते.मात्र, बटेंगे विरुद्ध जुडेंगे या हिंदी पट्ट्यातील घोषणा राज्यातील मतदारांना कितपत प्रभावित करतील याबाबत साशंकताच आहे.

‘भाजपबरोबर महायुतीमध्ये समान कार्यक्रमांतर्गत आहोत. राज्याचा विकास व्हावा, यासाठी महायुतीमध्ये सहभागी झालो आहोत,’ अशी भूमिका भाजपच्या ‘बटेंगे तो कटेंगे’ या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली.

### कुटुंबावर व समाजावर

आहे. यावेळी मोहन जगताप यांनी सर्व जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक देनार असे सांगितले. शनिवार दि.९ रोजी नितीन नाईकनवरे यांनी आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

यावेळी पत्रकारांना माहिती देताना नाईकनवरे म्हणाले की,माजलगाव मतदार संघात आपल्या आमदार महोदयाची या पाच वर्षात एकाधिकारशाही वाढली आहे. सुडाचं राजकारण करून त्यांनी अनेकांना राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या कुटुंबातील सदस्यांनाही त्यांच्या या राजकारणाचा परिणाम भोगावा लागला आहे.मराठा आरक्षण प्रश्ना संदर्भात त्यांचे वादग्रस्त विधान समाजाला न पचणारे आहे.त्यामुळे माझा मोहन जगताप यांना पाठिंबा आहे.

त्याचबरोबर माझ्यासोबत असणारे सरपंच,चेअरमन,कार्यकर्ते यांनीही मोहन जगताप यांची पसंती माझ्याजवळ बोलून दाखवली, त्यामुळे मी मोहन जगताप यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.असेही ते यावेळी या म्हणाले.मोहन जगताप हे कार्यकर्ता, सांभाळणारे,त्याला ताकद देणारे एकमेव राजकीय नेते आहेत असे नितीन नाईकनवरे यावेळी म्हणाले. तर मुस्लिम समाजाला दोन वेळेस नगराध्यक्ष,कैकाडी समाजाला जिल्हा परिषद सदस्यत्व,वडार समाजाच्या सर्वसामान्य व्यक्तीला नगराध्यक्ष,मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तीला पंचायत समितीचे सभापती पद देण्याचे काम तर ओबीसी समाजालाही सत्तेत पद देऊन सत्तेच्या भागीदारीत अनेक जात समूहांना वाटेकरी आमचे वडील माजी आ.बाजीराव जगताप यांनी केले आहे.तोच संस्कार माझ्यावर आहे. त्यामुळे जगताप परिवार हे सर्व समाजाला सन्मानपूर्वक वागनुक देणारं परिवार असल्याचे जगताप यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी माजी आ.बाजीरावभाऊ जगताप,किसनभाऊ नाईकनवरे, नारायण डक,दयानंद स्वामी, मिलिंद आव्हाड,कॉम्रेड दत्ता डाके, गंगाभीषण थावरे,सहाल चाऊस, नारायण होके,कचरू खळगे,राहुल जगताप,दत्ता नाईकनवरे कल्याण नाईकनवरे यांच्यासह पदाधिकारी सरपंच कार्यकर्ते नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.नितीन नाईकनवरे यांची सामाजिक, राजकीय क्षेत्रात उमदा मराठा कर्तुत्ववान तरुण म्हणून ओळख आहे.त्यांच्या पाठिंब्याने मोहन जगताप यांच्या विजयाला बळकटी मिळत असल्याचे दिसून येत आहे.

### हिवाळी अधिवेशनात वक्फ

यापूर्वी दिले होते. ही समिती कर्नाटक, आसाम, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांना भेट देत आहे आणि या महिन्यात आपला अहवाल सादर करेल.

या मुद्यावर सरकार आणि विरोधी पक्षांमधील मतभेद तीव्र आहेत. अध्यक्षांच्या मनमानी निर्णयाला जबाबदार धरत विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्याच्या दौऱ्यांवर बहिष्कार टाकला आहे. एआयएमआयएमचे लोकसभा सदस्य असदुद्दीन ओवैसी यांनी आणखी एक मुद्दा मांडला की, समितीला तपासाचे अधिकार नाहीत, त्यांचे काम केवळ विधेयकाचा विचार करणे आहे.

मित्रपक्षांची पडणार गरज

भाजपला एक अडचण आहे कारण राज्यसभेत त्यांचे बहुमत नाही, ते मित्रपक्षांवर अवलंबून आहेत. लोकसभेत ते बहुमत मिळवू शकतात. मात्र, राज्यसभेत टीडीपी, जनता दल (यू), अपना दल आणि इतर काही पक्ष त्यांच्या स्वतःच्या व्होट बँकेच्या राजकारणामुळे पाठिंबा देण्यास अनुत्सुक आहेत.

### ऊसतोड मुकादमाच्या

रुपये चोले यांनी वडवणी येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या येथील शाखेतून गुरुवारी काढले होते. ही रक्कम त्यांनी त्यांच्याजीपच्या चालकाच्या सीट खाली एका बॅगमध्ये ठेवले होते. या रकमेसोबत दोन चेकबुक ही होते. चोले हे आपली जीप घेऊन एका पेट्रोल पंपासमोर गॅरेजवर थांबले. चोले हे समोरच्या गॅरेजवर लाईट फोकस आणि टपाचे काम पाहण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्याने गाडीचे काच फोडून चालकाच्या सीट खाली ठेवलेले अडीच लाख रुपये चोरून नेले. थोड्या वेळाने चोले हे जीपजवळ परत आले असता जीपच्या काच फोडून सीट खालील पैसे चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी वडवणी पोलिस ठाणे गाठले.चोले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुरनं २७८/२०२४ कलम ३०३ (२) ३२४ (२) (६) भांदवीनुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास सफौ. गित्ते हे करीत आहेत.